महाराष्ट्र शासन

# इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०-२१   CIN - U85300PN2019NPL187405   ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/२३४७/२०२५-२६ दिनांक- २१/०७/२०२५

## परिपत्रक

**विषय :- JEE/NEET/MHT-CET 2025-27 परीक्षापूर्व ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता अर्ज करणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांना सूचना.**

महाज्योती संस्थेमार्फत JEE/NEET/MHT-CET 2025-27 परीक्षापूर्व ऑनलाईन प्रशिक्षण राबविण्यात येत असून इच्छुक विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याकरिता दि.१५/०५/२०२५ रोजी अर्ज करण्याची लिंक महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली होती, तसेच विद्यार्थ्यांनी सदर योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याकरिता विनंती केली असता विद्यार्थ्यांना दि.२०/०७/२०२५ रोजी पर्यंत मुदतवाढ देखील देण्यात आलेली होती. परंतु इयत्ता ११ ला विज्ञान शाखेत प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरु होण्यास आणखी काही दिवस विलंब होत असल्याने पुन्हा सदर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याकरिता मुदतवाढ देण्याची विनंती विद्यार्थ्यांनी महाज्योती या कार्यालयास केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केलेली विनंती विचारात घेता सदर योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व यापूर्वी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना अर्जात दुरुस्ती **(वैध नॉन क्रेमिलेयर, बोनाफाईड प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड)** करण्याकरिता दि.३१/०७/२०२५ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

स्वा
(विकास गडपायले)
प्रकल्प व्यवस्थापक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर